**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ ची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव- राजेंद्र गोरख लामतूरे

वय- ५० वर्षे,

व्यवसाय- पो.हे. ब.न.११२१ पोलीस स्टेशन, देवणी

राहणार- देवणी.

**अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सरकारी वकिल श्रीमती एम.आर.कुलकर्णी यांच्या वतीने**

१. मी सन-२०२१ मध्ये पोलीस स्टेशन औसा अंतर्गत दुरक्षेत्र किनीथोट येथे प्रभारी म्हणून काम पाहत होतो. मी २०२० ते २०२२ या कालावधीत तेथे कामकाज करीत होतो. दि.०९/०३/२०२१ रोजी पोलीस स्टेशन येथे हजर असताना हजेरी मेजर यांनी कळविले की, १०/०३/२०२१ रोजी गोंद्री शेत शिवारात सतिष भानुदास मंदाडे यांच्या शेतामध्ये बंदोबस्ताचे कर्तव्य आहे. सतिष मंदाडे यांचे शेत सर्वे क्र.३८ मध्ये तार कुंपन बांधणेसाठी बंदोबस्त होता. मी, एपीआय डोंगरे, पो.ना. बेरळीकर, पो.कॉ. बोळंगे, महिला पोलीस जाधव, महिला कॉ. अष्टांगे, महिला पोलीस पकाले आणि पो.कॉ. तुरे असे बंदोबस्तामध्ये होतो. मी सकाळी १०.०० वाजता पोहोचलो. त्या ठिकाणी तहसिल कार्यालयाचे तलाठी जे.के.चव्हाण हजर होते. त्या ठिकाणी सतिष मंदाडे यांनी जेसीबी लावली होती व तार कुंपनासाठी खड्डे खोदण्याचे काम सुरू होते. त्या ठिकाणी कस्तूराबाई, व्यकंट, निळकंठ, पांडूरंग शिंदे, सदानंद शिंदे, नवनाथ शिंदे आणि दयानंद शिंदे हे तेथे आले व सदरचे काम करू देणार नाही, कब्जा आमचा आहे, आमच्या वकिल साहेबांनी काम आडवायला सांगितले असे म्हणाले. त्याप्रमाणे ते सर्व लोक जेसीबीच्या आडवे आले व त्यांनी काम थांबविले. त्यानंतर तलाठी चव्हाण व एपीआय डोंगरे यांनी त्यांच्याकडे कागदपत्रांची व कोर्ट कामाच्या कागदपत्राची मागणी केली. आम्ही जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना मानत नाही असे म्हणून कस्तूरबाई नालीमध्ये जेसीबीच्या आडवे आली. त्यानंतर अश्वीनी शिंदे, गीता शिंदे व विजयमाला मोटे या जेसीबीच्या समोर येवून बसल्या. त्यानंतर

तलाठी चव्हाण यांनी तहसिलदार यांनी काम थांबल्याबाबत फोनवरून सांगितले. तसेच एपीआय डोंगरे यांनी आमच्या वरिष्ठ कार्यालयाला काम थांबल्याची माहिती दिली. त्यानंतर व्यकंट शिंदे व ईतर सर्वजण यांना तहसिलदार यांनी तहसिल कार्यालय औसा येथे बोलाविले. त्यांनी जाण्यास नकार दिला व तहसिलदार साहेबांना गरज असेल तर जागेवरच या असे म्हणाले. त्यानंतर पोलीस कर्मचारी व तलाठी हे पोलीस स्टेशन येथे परत गेलो. पोलीस नाईक बेरळीकर यांनी गैरकायदयाची मंडळी जमवून सरकारी कामात अडथळा केला म्हणून कायदेशीर फिर्याद दिली. मी तपास अधिका-याकडे माझा जबाब दिलेला होता. आज कस्तूरबाई शिंदे ही आरोपी सोडून ईतर सर्व आरोपी हजर आहेत. जेसीबी समोर आल्यावर ते लोक सतिष मंदाडे यांना हातवारे करून त्याच्या अंगावर जात होते. त्यावेळी आम्ही पोलीसांना मध्यस्थी करून त्यांना बाजूला करून सारवा-सारव केली.

**सरतपास पूर्ण.**

**मध्यतंरापर्यंत उलट तपास तहकूब.**

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR Date: 2026.03.11 11:03:45 +0530

(पी.पी.केस्तीकर)
दि.१०/०३/२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
लातूर.

**उलट तपास आरोपींकरिता विधीज्ञ श्री.बी.एल.शिंदे यांच्या वतीने शपथेवर सुरू**

२. त्यावेळेस माझ्या पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ठाकूर साहेब होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस बीट अंमलदार मीच होतो. दि.०९/०३/२०२१ रोजी मी बीट भागात डयुटी करून आलेलो होतो.

प्रश्न- कोव्हीड लॉकडाऊनच्या अनुषंगाने तुम्हाला कर्तव्ये दिली होती का ?

उत्तर- त्यावेळेस लॉकडाऊन नव्हते.

घटनेच्या तारखेच्या दरम्यान कोव्हीडच्या अनुषंगाने काही कर्तव्ये दिलेली नव्हती. त्या दिवशी कल्पना जाधव या हजेरी मेजर होत्या. मी त्या पूर्वी सतिष मंदाडे याच्या शेतामध्ये गेलेलो होतो. मी बंदोबदस्तासाठीचा लेखी आदेश पाहिलेला

नव्हता. मला कर्तव्याची वेळ सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० अशी दिलेली होती. आम्ही सर्व पोलीस कर्मचारी एकाच शासकीय वाहनाने गेलेलो होतो. पोलीस ठाण्यापासून ते ठिकाण अंदाजे २० किलोमीटर अंतरावर आहे. मला पूर्ण गट क्र.३८ चे क्षेत्र सांगता येत नाही. घटना स्थळाच्या जमीनीच्या पूर्वेला संगिता सतिष मंदाडे यांची जमीन, पश्चिमेस- गोंद्री ते धानोरा रस्ता व त्याच्या बाजूला पांडूरंग व्यकंट शिंदे यांची जमीन, दक्षिणेस-हासेगाव ते भुसणी जाणारा रस्ता, उत्तरेस-निळकंठ शिंदे यांची जमीन. तलाठी हे गोंद्री सज्ञाचे होते. घटनेच्या वेळी श्रीमती पुजारी या तालूका दंडाधिकारी या होत्या. त्या दिवशी मी श्रीमती पुजारी यांचा आदेश पाहिला नाही. आम्ही पोलीस कर्मचारी व तलाठी एकाच वेळेस घटना ठिकाणी पोहोचलो. मला जेसीबीचा क्रमांक सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जेसीबीच्या सहायाने तार कुंपन करता येत नाही. घटनेच्या वेळेस काम सुरू होवून १ ते २ मिनीटे झाली होती. जेसीबी काम सुरू होण्यापूर्वी आम्ही अर्धा तास आधी पोहोचलो होतो. जेसीबीचे काम हे रस्त्याच्या कडेला व शेताच्या कडेला चालू होते. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या ज्या कडेला काम चालू होते त्याच्या बाजूला आरोपींची कोणतीही जमीन नव्हती. ते जेसीबीचे काम हे शेताच्या पूर्व बाजूला चालू होते. कुंपनाच्या तार बांधणा-या व्यक्तीचे नाव मला सांगता येत नाही. जेसीबी चालकाचे नाव नबी पठाण असे होते. तो हासेगावचा होता. कुंपनाच्या कामासाठी किती व्यक्ती आले होते ते मला माहित नाही. कुंपनाचे काम म्हणजे शेताच्या हद्दीचे काम सुरू होते. त्या शेताचे किती क्षेत्रा भरते असे दाखविणारा मोजणीदार आमच्या सोबत नव्हता. आमच्या समोर कोणीही रान मोजले नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समक्ष शेताच्या हद्दी निश्चित केल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपींपैकी कोणत्या नावाची कोणती व्यक्ती आहे ते निश्चित सांगता येणार नाही. त्या दिवशी आम्ही मास्क घातलेले होते. मजूरांपैकी काहींनी मास्क घातले होते काहींनी नाही. जे काम चालू होते ते खाजगी वैयक्तीक काम चालू होते. आरोपींना गट क्र.३८ च्या मालकीचे कागदपत्र मागितले होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.३८ च्या ७/१२ मध्ये धोंडीराम शिंदे, निळंकठ शिंदे व पांडूरंग शिंदे यांची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उता-यामध्ये अधिकारक्षेत्रात

देखील त्यांची नावे आहेत. घटनेच्या दिवशी मी स्वतः त्या जमीनीचा ७/१२ उतारा पाहिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जमीनीच्या चतुःसिमा दर्शविणारा नकाशा मी त्या दिवशी पाहिला नाही. मला तेथे जाण्यासाठी न्यायालयाचा आदेश नव्हता. त्या वेळेस जेसीबीच्या स्टेअरिंगचा भाग पश्चिमेकडे व टापले पूर्वेकडे होते. आमच्या सोबत तीन महिला पोलीस कर्मचारी होत्या. आम्ही त्या महिला व पुरूषांपैकी कोणालाही ताब्यात घेतलेले नाही. त्या दिवशी बिट अंमलदार म्हणून आरोपींविरूध्द प्रतिबंधात्मक कार्यवाही केली नाही. मी आरोपींना बळाचा वापर करून जमीनीच्या बाहेर काढले नाही. त्या दिवशी आरोपींना ताब्यात घेवून पोलीस ठाण्यात आणले नव्हते. तहसिलदार औसा हे कार्यवाही अखेरपर्यंत घटना ठिकाणावर आले नव्हते. जेसीबीचे ठिकाण हे दक्षिण हद्दीपासून २० फुट अंतरावर होते. उत्तर हद्दीपासून किती अंतरावर होते ते सांगता येत नाही.  ज्या वकिलांचा उल्लेख झाला त्यांचे नाव मला माहित नाही. जमीनीचा ताबा कोणाचा आहे त्या संबंधी मी स्वतः कोणाचेही जबाब घेतलेले नाहीत. त्या प्रसंगी गावचे सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष त्या ठिकाणी आले नव्हते. मी स्वतः कोणत्याही वरिष्ठ अधिका-याला माहिती दिली नाही. मी १० तारखेला जायमोक्यावर जाणार असल्याबाबतची पूर्व नोटिस आरोपींना दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उता-यावरील ताबेदारांचे कोणाचे शेत कोणत्या ठिकाणी आहे ते मला नक्की सांगता येणार नाही. कस्तूरबाई शिंदे त्या ठिकाणी कोणत्या वेळी आल्या ती वेळ सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कस्तूरबाई हिचे तिच्या क्षेत्रात १५ फुट अतिक्रमण होते असे म्हणणे होते. हे म्हणणे खरे नाही की, कस्तूरबाई यांचे मोजणीदार आणून अतिक्रण काढून मग कुंपन करा असे म्हणणे होते. मी सतिष मंदाडे यांना घटनेच्या पूर्वी ६ महिन्या आधीपासून ओळखतो. वाद जमीनीव्यतिरिक्त् सतिष मंदाडेची आणखी कोठे जमीन आहे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी आमच्या ताफयामध्ये सर्वात वरिष्ठ हे श्री.डोंगरे हे होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी पोलीसांवर हमला किंवा बल प्रयोग झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जेसीबी हे वाहन व जेसीबी चालक हे शासकीय नव्हते. त्या दिवशी आम्ही संध्याकाळी ६.३० वाजता पोलीस ठाण्यात परत गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की,

मी बिट अंमलदार म्हणून घटनेबाबत पोलीस ठाण्यात त्या दिवशी फिर्याद दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी सतिष मंदाडे यांनी आम्हाला हाताशी धरून जमीनीचा ताबा घेण्यासाठी ही सर्व कार्यवाही केली. हे म्हणणे खरे आहे की, बंदोबस्ताला जाताना बंदोबस्तासाठी जाण्याचा उद्देश स्टेशन डायरीला नोंद करून जावे लागतो. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वाहनाने जातो त्याच्या वाहन चालकाने लॉगबुकला नोंदला नोंद घ्यावी लागते. तपासि अधिका-याने माझा जबाब गुन्हा दाखल झाला त्याच्या दुस-या दिवशी घेतला. मी जबाब देताना तपासी अधिका-याला तार कुंपन बांधण्यासाठी बंदोबस्ताला जायचे होते असे सांगितले होते. मी तपासि अधिका-याला आमच्या सोबत श्रीमती जाधव या पोलीस कर्मचारी असल्याचे सांगितले होते. मी जबाब देताना तपासी अधिका-याला ते लोक कब्जा आमचा आहे व त्यांच्या वकिलांनी काम आडवायला सांगितले असे सांगितले होते. मी जबाब देताना तपासी अधिका-याला कस्तूरबाई नालीमध्ये जेसीबीच्या आडवी आली असे मी तपासी अधिकारी यांना सांगितले होते. डोंगरे यांनी वरिष्ठ अधिका-यांना काम थांबल्याचे सांगितले होते असे मी तपासि अधिका-याला सांगितले होते. वरिल सर्व मजकूर माझ्या तपास टिपणामध्ये का नमूद नाही त्याचे कारण सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सतिष मंदाडे व पोलीस कर्मचा-याच्या संगनमताने आरोपीच्या जमीनीचा काही भागाचा ताबा घेण्यासाठी आरोपींविरूध्द गुन्हा नोंद करून तपासी अधिका-याने कार्यवाही केल्याने मी खोटा जबाब देत आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, दि.०९/०३/२०२१ रोजी पोलीस स्टेशन येथे हजर असताना हजेरी मेजर यांनी कळविले की, १०/०३/२०२१ रोजी गोंद्री शेत शिवारात सतिष भानुदास मंदाडे यांच्या शेतामध्ये बंदोबस्ताचे कर्तव्य आहे. सतिष मंदाडे यांचे शेत सर्वे क्र.३८ मध्ये तार कुंपन बांधणेसाठी बंदोबस्त होता. मी, एपीआय डोंगरे, पो.ना. बेरळीकर, पो.कॉ. बोळंगे, महिला पोलीस जाधव, महिला कॉ. अष्टांगे, महिला पोलीस पकाले आणि पो.कॉ. तुरे असे बंदोबस्तामध्ये होतो. मी सकाळी १०.०० वाजता पोहोचलो. त्या ठिकाणी तहसिल कार्यालयाचे तलाठी जे.के.चव्हाण हजर होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी सतिष मंदाडे

यांनी जेसीबी लावली होती व तार कुंपनासाठी खड्डे खोदण्याचे काम सुरू होते. त्या ठिकाणी कस्तूराबाई, व्यकंट, निळकंठ, पांडूरंग शिंदे, सदानंद शिंदे, नवनाथ शिंदे आणि दयानंद शिंदे हे तेथे आले व सदरचे काम करू देणार नाही, कब्जा आमचा आहे, आमच्या वकिल साहेबांनी काम आडवायला सांगितले असे म्हणाले. त्याप्रमाणे ते सर्व लोक जेसीबीच्या आडवे आले व त्यांनी काम थांबविले. त्यानंतर तलाठी चव्हाण व एपीआय डोंगरे यांनी त्यांच्याकडे कागदपत्रांची व कोर्ट कामाच्या कागदपत्राची मागणी केली. आम्ही जिल्हाधिकारी व तहसिलदार यांना मानत नाही असे म्हणून कस्तूरबाई नालीमध्ये जेसीबीच्या आडवे आली. त्यानंतर अश्वीनी शिंदे, गीता शिंदे व विजयमाला मोटे या जेसीबीच्या समोर येवून बसल्या. त्यानंतर तलाठी चव्हाण यांनी तहसिलदार यांनी काम थांबल्याबाबत फोनवरून सांगितले. तसेच एपीआय डोंगरे यांनी आमच्या वरिष्ठ कार्यालयाला काम थांबल्याची माहिती दिली. त्यानंतर व्यकंट शिंदे व ईतर सर्वजण यांना तहसिलदार यांनी तहसिल कार्यालय औसा येथे बोलाविले. त्यांनी जाण्यास नकार दिला व तहसिलदार साहेबांना गरज असेल तर जागेवरच या असे म्हणाले. त्यानंतर पोलीस कर्मचारी व तलाठी हे पोलीस स्टेशन येथे परत गेलो. पोलीस नाईक बेरळीकर यांनी गैरकायदयाची मंडळी जमवून सरकारी कामात अडथळा केला म्हणून कायदेशीर फिर्याद दिली. मी तपास अधिका-याकडे माझा जबाब दिलेला होता. आज कस्तूरबाई शिंदे ही आरोपी सोडून ईतर सर्व आरोपी हजर आहेत. जेसीबी समोर आल्यावर ते लोक सतिष मंदाडे यांना हातवारे करून त्याच्या अंगावर जात होते. त्यावेळी आम्ही पोलीसांना मध्यस्थी करून त्यांना बाजूला करून सारवा-सारव केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात खोटी साक्ष दिली.

**उलट तपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2026.03.10 15:53:56 +0530

(पी.पी.केस्तीकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
लातूर.

दि.१०/०३/२०२६